**वाचले:** १) शासन निर्णय क्र.पीकेए १०५९-६-ल दिनांक ७ मे १९५९
२) शासन निर्णय क्र. केओटी-२०१२/प्र.क्र.४३२/ई-१०, दिनांक ५ सप्टेंबर २०१३
३) शासन निर्णय क्र. केओटी-२००३/प्र.क्र.५३(भाग-३)ई-१० दिनांक २२ जानेवारी २००७
४) शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१६४/२०११/१६-ब,दिनांक १२ डिसेंबर २०११
५) मा.अध्यक्ष,कोतवाल भरती प्रक्रीया तथा उपविभागीय अधिकारी,चांदवड उपविभाग,चांदवड यांचेकडील पत्र क्र.फौज/कावि/५२५/२०१६ दि.४/०६/२०१६

---

तहसिल कार्यालय,चांदवड
क्र.फौज/कावि/२१२/२०१६
चांदवड दि. २३/०६/२०१६

## परिशिष्ट-२

## नमुना-अ

**(कोतवाल भरती व सेवायोजना यासंबंधी नियम-१४पहा)**

अध्यक्ष,कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी,चांदवड उपविभाग चांदवड यांचेमार्फत तहसिलदार चांदवड यांचे आस्थापनेवरील कोतवाल संवर्गातील पदे भरणेसाठी जाहीरनामा प्रसिध्द करणेत येऊन दिनांक २४/०४/२०१६ रोजी लेखी परीक्षा व दिनांक२०/०५/२०१६ रोजी मुलाखत घेवुन पात्र उमेदवारांची प्रवर्ग निहाय जाहिरनाम्यात नमुद अटी व शर्तीस अधिन राहुन निवड झाल्याने शिफारस करण्यात आलेली आहे. सदर निवड केलेल्या उमेदवारांना कोतवाल या पदावर रक्कम रु.५०००/- या स्थिर वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील नमुद केलेप्रमाणे सजेकरीता नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | निवड केलेल्या उमेदवारांची नांव | ज्या प्रवर्गासाठी निवड करण्यात आली आहे. तो प्रवर्ग व आरक्षण | उमेदवारांचा राहण्याचा पत्ता | कोतवाल पदावर नियुक्तीच्या सजेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | ठाकरे पंकज कोंडाजी | नामाप्र | रा.काजीसांगवी ता.चांदवड | काजीसांगवी |

उपरोक्त उमेदवारांची कोतवाल या पदावर खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीवर नेमणूक करण्यात येत आहे.

१) उपरोक्त उमेदवाराची नेमणुक ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असुन भविष्यात पदे कमी झाल्यास किंवा इतर कारणास्तव त्यांची सेवा समाप्त केल्यावर त्यांचा या पदावरील नेमणुकीसंबंधी कोणताही हक्क राहणार नाही तसेच त्यांची नेमणूक कोणतीही पुर्वसुचना/नोटीस न देता व काहीही कारण न दाखवता समाप्त करण्यात येईल.

२) उमेदवाराने सदर आदेश मिळाल्याचा दिनांकापासुन ३० दिवसाच्या आत नेमणुकीच्या ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा त्यांची नेमणूक रद्द समजण्यात येईल व त्यांचे ऐवजी प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल. सदर उमेदवारांची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपातील असुन पुर्व चारित्र्य व वर्तणुकीच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबुन राहील. सदरचा अहवाल आक्षेपार्ह असल्यास त्यांना नोकरीतुन काढुन टाकण्यात येईल.

३) मा.जिल्हा शल्य चिकीत्सक,नाशिक यांनी त्यांना दिलेल्या वैद्यकीयदृष्टया व शारीरिक दृष्टया पात्र असल्याने प्रमाणपत्र एक महिन्याच्या आत सादर करावे.

४) उमेदवारांना त्यांची नेमणूक/नोकरी सोडावयाची असल्यास त्यांनी त्याबाबत आगाऊ सुचना देऊन राजीनामा मंजुर करुन घ्यावा.

५) नेमणुकीच्या ठिकाणी हजर होताना वय,शैक्षणिक अर्हता, जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र तसेच लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र (प्रपत्र-अ) इ.मुळ कागदपत्र तहसिल कार्यालयात सादर करावेत. सदर कागदपत्रांची तपासणी केलेनंतर हजर करुन घेतले जाईल.

६) आरक्षित पदावरील उमेदवारांनी जातवैधता प्रमाणपत्र ३ महिन्याचे आत इकडिल कार्यालयास सादर करावीत.

७) उमेदवारांस हजर होते वेळी भारतीय राज्य घटनेतील तरतुदीनुसार भारतीय संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत शपथ घ्यावी लागेल.

८) भविष्यामध्ये शासनाकडुन वेळोवेळी पारित करण्यात येणारे आदेश, कायदे, नियम उमेदवारास बंधनकारक राहतील.

९) उमेदवाराने सादर केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे/दाखले ही भविष्यात चुकीची/खोटी/बनावट आढळुन आल्यास सदर उमेदवाराविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करणेत येऊन त्यांना सेवेतुन काढुन टाकण्यात येईल याबाबत उमेदवाराने हजर होतेवेळी स्वतंत्र प्रतिज्ञापत्र सादर करावे.

१०) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम-१९७९ च्या नियम ५ अन्वये कोतवाल हा राजकारणात किंवा विधानसभेच्या कोणत्याही निवडणुकीत अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाग घेवु शकणार नाही.

११) कोतवाल पदभरती सन २०१५-१६ मधील अटी व शर्तीची पुर्तता धारण करत नसल्याचे निदर्शनास आल्यास आपणांस कोणतीही पुर्वसुचना न देता कोतवाल पदावरुन काढुन टाकण्यात येईल.

सदर आदेश आज दिनांक१३/०६/२०१६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले असे.

(माणिक आहेर)
तहसिलदार चांदवड

**प्रत:** मा.जिल्हाधिकारी नाशिक (कुळकायदा शाखा) यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:** मा.उपविभागीय अधिकारी, उपविभाग चांदवड यांना माहितीसाठी सविनय सादर

**प्रत** प्रत: तलाठी काजीसांगवी

२/- सदरचा आदेश संबंधीतास बजावुन अनुपालन अहवाल सादर करावा.

(माणिक आहेर)
तहसिलदार चांदवड